**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १६ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **"प्रधानमंत्री धन-धान्य कृषी" योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**
2. **संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर येत्या रविवारी केंद्र सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक.**
3. **महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादातील १४ गावे चंद्रपूर जिल्ह्यात येणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
4. **गोंदिया जिल्ह्यातली खंडित वीजपुरवठ्याची समस्या सोडवण्यासाठी विविध प्रकल्प सरकारने हाती घेतले असून, यादवारे लवकरच ही समस्या सुटेल, अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**

-----------------------------------

**प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आज सहा वर्षांच्या कालावधीसाठी "प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना" ला मंजुरी दिली. ही योजना २०२५-२६ पासून सुरू होईल आणि १०० जिल्ह्यांना व्यापेल. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना ही नीती आयोगाच्या आकांक्षी जिल्हा कार्यक्रमातून प्रेरणा घेत आहे आणि कृषी आणि संबंधित क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणारी अशा प्रकारची पहिलीच योजना आहे. या योजनेचा उद्देश कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधता आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब वाढवणे, पंचायत आणि ब्लॉक पातळीवर कापणीनंतर साठवणूक क्षमता वाढवणे, सिंचन सुविधा सुधारणे आणि दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्ज उपलब्ध करने, सुलभ करणे आहे, अशी माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली -**

***(होल्ड बाइट - माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव)***

***100 ऐसे जिले जिसमें कृषि पर तीन पैमानों पर वो बाकी सब जिलों से पीछे हो। ऐसे 100 जिलों को चयनित करके उसमें एक फोकस्ड वे में 11 मंत्रालयों के 36 स्कीम्स इन सबको कन्वर्ज करके एक इंटीग्रेटेड वे में कृषि का विकास करें। ये प्रधानमंत्री धन धान्य कृषि योजना का उद्देश्य है/ बहुत ही महत्वाकांक्षी, बहुत***

*महत्वपूर्ण, बहुत ही एक गेम चेंजिंग स्कीम ये होने वाली है राज्यों का सहयोग लिया जाएगा भरपूर इसमें जिले के लेवल पे ब्लॉक के लेवल पे और राज्य के लेवल पे गहन कंटीन्यूअस मॉनिटरिंग की जाएगी।*

-----------------------------------

## पावसाळी अधिवेशन

येत्या २१ तारखेपासून सुरु होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने येत्या रविवारी २० तारखेला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकार सर्व राजकीय पक्षांकडून सहकार्य मागणार आहे. हे अधिवेशन पुढील महिन्याच्या २१ तारखेपर्यंत चालेल. अधिवेशनादरम्यान अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा होऊन ते मंजूर होण्याची शक्यता असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

-----------------------------------

## ऑपरेशन सिंदूर

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने ड्रोन आणि इतर मानवरहित शस्त्र प्रणालींचा वापर केला होता, जे भारतीय सशस्त्र दलांनी निष्क्रिय केल्याची माहिती संरक्षण दल प्रमुख अनिल चौहान यांनी दिली. मानवरहित हवाई वाहने आणि काउंटर-यूएएस स्वदेशीकरण या विषयावरील कार्यशाळेला ते आज नवी दिल्लीत संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूरमुळे स्वदेशी संरक्षणाच्या मानवरहित हवाई प्रणाली तैनात करण्याचं महत्त्व स्पष्ट झाल्याचं सांगून देशाच्या सुरक्षेसाठी संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक आणि उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची गरज असल्याचं चौहान यांनी नमूद केलं.

-----------------------------------

## नागपूर आकाशवाणी वर्धापन दिन

नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला आज 77 वर्ष पूर्ण झाली. 1948 मध्ये आजच्या दिवशी नागपूर आकाशवाणी केंद्र स्थापित झाले. त्या दिवशी पासून हे केंद्र जवळजवळ ८ दशके श्रोत्याना अविरत दर्जेदार माहिती आणि मनोरंजन सेवा देत आहे. वर्धापन दिनानिमित्त आज नागपूर आकाशवाणीत सुगम संगीताचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यात बुद्धरत्न लिहितकर आणि भैरवी काळे या आकाशवाणीच्या 'अ' श्रेणीच्या गायकांनी सुश्राव्य गायन करून आजचा सोहळा अधिकच रंगतदार केला. यावेळी मोठ्या संख्येने आकाशवाणी नागपूरचे कर्मचारी

आणि अधिकारी उपस्थित होते. आकाशवाणीच्या इमारतीवर आज वर्धापन दिनानिमित्त विशेष रंगीबिरंगी रोषणाई करण्यात आली आहे.

-------------------------------------

वृक्षांची लागवड

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत जिल्हा परिषद नागपूरला २०२५ सालासाठी ५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. सदर अभियान जिल्हयात राबविवण्यासाठी  नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री चंद्रशेखर बाबनकुळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत १५ जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये एकाच दिवशी २ लक्ष ५०७६ वृक्षांची नियोजनबध्द व यशस्वी लागवड करण्यात आली. ही भव्य वृक्ष लागवड मोहिम नरेगा आणि विविध योजनांच्या सहाय्याने राबविण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी विभागनिहाय स्पष्ट उद्दिष्टे निश्चित करून प्रत्येक विभागाला वृक्ष लागवड करण्याची जबाबदारी सोपवली होती.

-------------------------------------

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती तालुक्यातल्या १४ गावांचा महाराष्ट्रात समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती दिली असून, लवकरच अंतिम निर्णय होणार असल्याचं सांगितलं...

*(होल्ड बाइट - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे)*

*महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील 14 गाव हे तेलंगाणा आणि महाराष्ट्र बाऊंड्रीवर आहे. आणि हे चौदाही गाव महाराष्ट्राच्या जमाबंदी आयुक्तांच्या रेकॉर्डप्रमाणे सर्व गावं महाराष्ट्राची आहे. त्यामुळे सर्व गाव महाराष्ट्रामध्ये याठिकाणी त्यांचं महसूल रेकॉर्ड आणि यानंतर त्यांचा संपूर्ण जो काही व्यवहार आहे तो जरी त्या भागात आहे. या भागात असला, त्या राज्यात या राज्यात व्यवहार आहे.  त्यामुळे गावात ते गावठाण आहे ते महाराष्ट्रामध्येच राहील याबद्दलची कारवाई आम्ही चालू केलेली आहे याबद्दलचा पुरावा रेकॉर्ड आमच्याकडे आहे आणि त्याची नोंद आता महाराष्ट्र शासनाने घेतली आहे.*

या गावांबाबत गेल्या अनेक वर्षांपासून सीमावादामुळे तेलंगणा की महाराष्ट्र, असा संभ्रम होता. या निर्णयामुळे सीमाभागातल्या गावांचा प्रश्न मार्गी लागेल.

-------------------------------------

## गोंदिया वीजपुरवठा

गोंदिया जिल्ह्यातली खंडित वीजपुरवठ्याची समस्या सोडवण्यासाठी विविध प्रकल्प सरकारने हाती घेतले असून याद्वारे लवकरच ही समस्या सुटेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. आमदार परिणय फुके यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. याला उत्तर देताना, फडणवीस यांनी आमगाव इथल्या केंद्रातलं 50 एम.व्ही.एच. क्षमतेचं रोहित्र खराब झाल्याने आणि या क्षमतेचं बदली रोहित्र लगेच उपलब्ध न झाल्यामुळे 25 एम.व्ही.एच. क्षमतेचं रोहित्र तात्पुरतं बसवण्यात आलं असून त्यामुळे सध्या विजपुरवठ्यात अडचणी येत आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होत आहे, मात्र 50 एम. व्ही. एच.चं रोहित्र पुन्हा लावण्याची प्रक्रिया येत्या 22 जुलैपर्यंत पूर्ण केली जाईल, अशी माहिती सभागृहाला दिली.

-----------------------------------

## तेल मंडल

शाळांना विद्यार्थ्यांच्या निरोगी जीवनशैलीसाठी शाळांमधे तेल मंडळाची स्थापना करण्याचे आदेश सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दिले आहेत. पौष्टिक अन्न आणि व्यायामावर भर देणारे उपक्रम राबवण्याचे निर्देशही सीबीएसईने शाळांना लिहिलेल्या पत्रात दिले आहेत. तसंच, शाळांमध्ये जिन्यांचा वापर, दोन तासांमध्ये छोटी व्यायामाची विश्रांती आणि चालण्याच्या व्यायामाचा समावेश वेळापत्रकांमध्ये करण्याचे आदेश दिले आहे.

-----------------------------------

## शिवसेना रिपब्लिकन सेनेची युती

शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेची युती झाल्याची घोषणा शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी आज केली. मुंबई इथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा करण्यात आली. गेल्या अडीच वर्षांत सामान्य माणसासाठी तसंच गोरगरीब, शोषित आणि वंचितांसाठी आपल्या सरकारने विविध योजना सुरू केल्याचं एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

-----------------------------------

## स्वच्छता अभियान

राज्य शासनाच्या निर्देशानुसार, तसेच अकोला महापालिकेचे आयुक्त आणि प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशानुसार १ ते ३१ जुलैदरम्यान 'सफाई

अपनाओ, बिमारी भगाओ' हे विशेष स्वच्छता अभियान अकोला शहरात राबवले जात आहे. 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' हे ब्रीदवाक्य घेऊन अकोलेकर नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करणे, हाच या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

-----------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, अकोला, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली, वाशीम, चंद्रपूर जिल्ह्यांत बहुतांश ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि पाऊस येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

-----------------------------------

प्रतिबंधित गुटखा

बुलढाणा जिल्ह्यात चिखली इथं आयशर ट्रकमधून ८० लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी मध्य प्रदेशातला चालक सईद खान राशीद खान याला अटक केली असून, मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला.

-----------------------------------

ऑपरेशन मुस्कान

राज्यात लोक बेपत्ता होण्याच्या घटना वाढत असून बेपत्ता झालेल्या लहान मुलांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान, महिलांसाठी ऑपरेशन शोध अशा दोन मोहिमा राबवण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. लोक बेपत्ता झाल्याच्या प्रकरणांचा तपास मागे पडू नये यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात Missing Cell स्थापन करण्यात आली असून, महिला अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी असेल, असंही फडणवीस म्हणाले. यावर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, याकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित केली.  भरोसा सेलद्वारे महिलांना सगळ्या समस्यांचा उपाय एका ठिकाणी देण्याचा सरकारचा प्रयत्न असून सापडलेल्या महिलांसाठी समुपदेशन केंद्रं वाढवण्याचाही विचार करू, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

-----------------------------------